



http://www.facebook.com/vicharkari

Isolated Portal - http://wp.me/VzyA

साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नाव : एक होते राजे

लेखक आणि अर्कचित्रकार : मयुरेश कुलकर्णी ('तो आणि ती'चा कवी)
mayuresh87@gmail.com

© मयुरेश कुलकर्णी
(हे पुस्तक विक्री साठी नसून कोणत्याही प्रकारे या पुस्तकाची विक्री किंवा कमर्शिअल वापर करण्यापुर्वी लेखक आणि प्रकाशकांची परवानगी आवश्यक आहे)

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
esahity@gmail.com

इतर पुस्तकांसाठी आणि मासिकांसाठी - www.esahity.com

# वैधानिक इशारा

हे पुस्तक दोन घटका करमणुकीसाठी आहे. उगाचच मेंदूला ताप करून घेऊ नये. जास्त खोलात शिरू नये. जास्त (काय म्हणतात ते ) साहित्यिक मूल्य वगैरेंचा विचार करू नये. अशाने  आजारी पडाल. सर्दी होईल. पडसें होईल. खोकला होईल. आवाज घोगरा होईल. नाक लाल होईल. शेंबुड येईल. मग लोक लांब लांब रहातील.

आम्हाला पुस्तक कसं वाटलं ते कळवा. पण जास्त उपदेश वगैरे करू नका. आम्ही नांवाचे विचारकरी आहोत. म्हणजे राजे नांवाचे लोक भेटल्यावर त्यांना तुम्ही कुठल्या राज्याचे वगैरे विचारता का ? राजा नांवाचे लोक हल्ली तिहार जेल मध्ये पण असतात. सरदार नावाचा मुलगा भेटल्यावर त्याला सैन्य कुठे असं विचारता का ? तेव्हा उगाचच विचारकरी भेटले म्हणून विचारांना चालना देऊ नका. यात कविता पण आहेत. ते पण असंच. आता कविता नावाची मुलगी भेटली तर लगेच वृत्त, यमक वगैरे चर्चा करता का तिच्याशी. तशाच या नावाच्या कविता आहेत.

तुम्ही पण ना ...!  थोडं समजून घ्या ना यार !

# अर्पणपत्रिका

आपल्याहून भारी पोरींना पटवण्यात
मश्गूल असणाऱ्या सर्व मजनूंना हे
पुस्तक आदरभावाने समर्पित.

www.facebook.com/vicharkari


ना देश, ना दरबार
ना सैनिक, ना सुभेदार
हे राजे अशे मजेदार
नाव दगडू राजे सरदार
??
उधाराचं धोतर आणि सदरा भाड्याचा
गोल्ड प्लेटींग केलेला मुकूट पत्र्याचा
आशिर्वाद नाही लक्ष्मिचा
तरी तोरा आमच्या राजाचा

# "छत्रपती"



जत्रेतली चमकती म्यान
त्यावर फ्रि मिळालेली तलवार
हाती धरली छत्री लहान
म्हणून लोकं "छत्रपती" म्हणणार




म्यानेत अडकली तलवार
दाढी-मिशा वाढल्या फार
सोसेना केसांचा भार
गेली निघून मिशांची धार




# घोडे, टापा, सैन्य




राजा दुचाकी सायकल चालवायचा
चालवताना रेकॉर्डर प्ले करायचा
घोड्यांच्या टापांचा आवाज यायचा
मोठ्या सैन्याचा भास व्हायचा
टँ...टँ..डँ...टण..
टण...णण..डँटडँ...
राजे निघायचे जोरात
सायकलीवर गल्ली-बोळात
टापांचा आवाज वाऱ्यात
गरिबीची झलक डोळ्यात
टँ...टँ..डँ...टण..
टण...णण..डँटडँ..

# नोकरी दहा ते चार


उघडतं म्युझीयमचं दार
राज्यांची नोकरी दहा ते चार
युनिफॉर्म घालून उभा हा सरदार
कुटूंबाचं पोट भराया लढणार
म्युझीयम
सगळ्या राज्यांचे
लाईव्ह एक्झीबीट
पार्ट टायमाची नोकरी राजाला
पोशाख म्युझीयमनं दिलेला
दुपारी आम्टी-भात वाढलेला
हफ्ता पगारातून काटलेला
कलीयुगातले हे फक्त आडनावामुळे असलेले
राजे, आई-बाबांचं पोट भरायला म्युझीयम
मध्ये लाईव्ह एक्झीबीट म्हणून उभे असतात


# चट्टेवाली चड्डी



रोज राजे नोकरी करतात
रोज पोशाख-मुकूट घालतात
पुरेसे पैसे मिळतात
रात्री आपल्या झोपडीत जातात
वर फाटका बनियन चढवतात
खाली चट्टेवाली चड्डी घालतात
गप-गुमान जाऊन झोपतात




राजे किल्ले नाही लढवित
किल्ले बनवतात दिवाळीत
ही म्युझीयमची रीत
फटाके आणि लाडू मिळतात
किल्ला केल्याच्या बदल्यात




# एकटेच कमाऊ



राजे नाही पैसे उडाऊ
घरात एकटेच कमाऊ
घरी आई-बाप आणि भाऊ
बिचारे कोणा कोणाला घालतील खाऊ



एकदा वाजले साडे-चार
तरी कामावरच राजे सरदार
दिसली त्यांच्या स्वप्नातली नार
राज्यांना चढला प्रेमाचा ज्वार



# 'फुलून-देवी'



नार मुलगी म्युझीयमच्या मालकाची
नार भरपुर खात्या-पित्या घरची
शरीराला शोभणाऱ्या 'फुलून-देवी' नावाची
पण राजांना हीच बायको करायची


राणी झाली 'फुलून-देवी' फार खाल्ल्यामुळे
राजा झाला अंधळा प्रेमात पडल्यामुळे
घाबरला मालकाची मुलगी असल्यामुळे
राजा झाला गुलाम राणी आल्यामुळे



# प्रेमाची तहान



राज्यांना लागली प्रेमाची तहान
त्यांनी मेंदू टाकला गहाण
राज्यांची किर्ती लहान
राणीची मुर्ति महान



राजे करायचे ओव्हर-टाईम काम
ती दिसल्याशिवाय नाही जीवाला आराम
आता तीच गंगा आणि तीच चार-धाम
जीवनाच्या मोठ्या प्रश्नावर पूर्ण-विराम




# हेल्मेट

१

राजे प्रेमाच्या थंडीत गार
मिशा आता प्रेमात धारदार
हृदयाला आता प्रेमाचा आधार
पण हे तिला कसे सांगणार




तिच्या आकाराला घाबरतात
म्हणून हेल्मेट घालून जातात
तिच्या समोर उभे राहतात
नजरेला नजर मिळवतात
तिचा बाप आहे का ते बघतात
आणि तिला हृदयातलं काय ते सांगतात



# मस्त कॉफि




म्हणतात 'ला मेरिडियन'मध्ये जाऊ
चांगली मस्त कॉफि पिऊ
झाडांभोवती पळत गाणी गाऊ
प्रेमाच्या पावसात न्हाऊ
ती म्हणते आपण 'ला मेरिडियन'ला जाणार
मी भूक लागली तर खाणार
मला काय वाटतं ते बघणार
आणि मग हो किंवा नाही म्हणणार

# राजे लाचार



राजे पटकन करतात विचार
पाकिटाला पेलवेल का पैशाचा भार
'ला मेरिडियन' टपरीचं खाऊन होईल आजार
पण 'हो' म्हणतात राजे लाचार



तिच्या डोक्यात हॉटेल छान
यांच्या डोक्यात टपरी लहान
होणाऱ्या गोंधळाचा नाही अनुमान
'ला मेरिडियन'कडे उडतं विमान




# खाण्या-पिण्याचा थाट

१२

हॉटेल मधल्या किमतींमुळे चाट
राज्यांच्या कपाळावर आठ्या घनदाट
राणीचा खाण्या-पिण्याचा थाट
राज्यांची भाडी घासताना लागते वाट

जेवणानंतर राणी एकट्याच तासंतास
राज्यांना भांडी घासण्याचा त्रास
प्रेम सोडून, म्हणतात घेऊया संन्यास
कहाणी ऐकून राणीला लागतो राज्यांचा ध्यास





# प्रेमाची पिडा

१३

राणी होते वेडी आणि राजा वेडा
प्रेमींच्या हृदयात प्रेमाची पिडा
गाणी गातात झाडांभोवती क्रिडा
आता बापाशी असतो शेवटचा लढा



राजे म्हणतात:
"तुझ्या डोळ्यांच्या डबक्यात
मी रात्रंदिवस पोहतो
आणि तुझ्या अश्रुंच्या धबधब्यात
मी तुझ्या गालावर वाहतो"




# काव्य प्रसवायचा प्रयत्न

१४

'फुलून-देवी' म्हणतात:
"माझ्या डोळ्यांची, अश्रुंची
अशी पाण्याबरोबर तुलना करता
राजे तुम्ही राज्य करता का
वॉटर-वर्क्स मधे काम करता"





राजे म्हणतात:
"तुझ्या प्रेमात मी वेडा,
तुझ्यासाठी काव्य प्रसवायचा प्रयत्न करतोय
तुझ्या मोठ्या शरीरावर आणि छोट्या मेंदूवर
प्रेम करायचा प्रयत्न करतोय"



# बाप

१५

राणीला काव्य काही समजत नाही
पण काव्यापाठचं प्रेम कळतं
शब्दांचे गुंते सोडवता येत नाही
पण त्यातल्या भावनांचे धागे दिसतात




राजाच्या काव्याला नाही दाद
सोडतात ते शब्दाचा नाद
बापाला पटवलं नाहीतर राजे बाद
म्हणून बघतात बाप देतो का प्रतिसाद



# रागाची आग



तिच्या बापाला कळतं, येतो राग
टाळक्यात पेटते रागाची आग
म्हणतो "डोळे उघड, येऊदे तुला जाग
राणीच्या आवडी-निवडी फारच महाग"



राजा म्हणतो "मी प्रेम करतो
मी तिची काळजी घेतो"
बाप आजूनच रागावतो
चड्डेवाल्या चड्डीत राजाला उभारतो




# अश्रुंचा धबधबा



रात्रीनंतर आली प्रभा
म्युझीयम मधे भरली सभा
राजा प्रेमाखातर चड्डीत उभा
राणीच्या अश्रुंचा सुरु धबधबा





राजा घालतो विजार, चढवतो कोट
घेतो जत्रेतली तलवार, कापतो बोट
घेतो प्रतिज्ञ्या "प्रेम करीन खरं, नाही खोटं
स्वत:चं पोट मारून, भरेन राणीचं पोट"



# बाप नापास



राणीला होतो बापाचा त्रास
ती जेवणार नाही म्हणते, करते उपास
प्रेमात राजा पास, बाप नापास
प्रेम खरं आहे याचा लागतो तपास




राजा कन्येचा विचार करतो
मुलीच्या प्रकृतिच्या चिंतेत राग हरवतो
जे होतय ते होऊदे म्हणतो
प्रेमाच्या कॉफित साखरेसारखा विरघळतो



# आळवाचे फदफदे न भात



प्रेम करतं अडचणींवर मात
बाप देतो तिचा हात, त्याच्या हातात
लग्नात खातो आळवाचे फदफदे न भात
आणि राजा-राणी एका घरात




राजा राणीला होतो बालक
होतात ते आदर्श पालक
राजे आता म्युझियमचे चालक
आणि म्युझियमचे मालक



# प्रेम काय काय करायला लावतं



कधी चट्टेवाल्या चड्डीत उभं करतं
कधी भांडी घासायला लावतं
कधी नकळत कविता प्रसवतं
राजांनापण शिपाई बनवतं
हे प्रेम काय काय करायला लावतं



--समाप्त--

www.facebook.com/vicharkari

# आजवरची प्रकाशित ई पुस्तकं

www.esahity.com

टल्लीची शाळा : टल्ली
मकरंदची त्रिवेणी : कवी मकरंद सावंत, मुंबई
ग्रेव्हयार्ड लिटरेचर : कवी प्राजक्त देशमुख, नाशिक
तो आणि ती : कवी मयुरेश कुलकर्णी, द आफ्रिका
प्रियेचे अभंग : कवी रमेश ठोंबरे, औरंगाबाद
चार क्षण : संतोष नार्वेकर, मुंबई
देशी दारूचे दुकान : लेखक धुंद रवी, पुणे
ई शाळा : मराठी कसे लिहावे : भारती सरमळकर, मुंबई
तो , मी आणि सिगरेट : कवयित्री स्वप्ना कोल्हे, नाशिक
मोरया : संकलन : वैशाली कुलकर्णी, अमृता ढगे, अंबरनाथ, ठाणे
लोकल गोष्टी : स्वाती फडणीस, मुंबई
मीरा : प्राजक्त देशमुख, नाशिक
ओथंब : मंजिरी दाभोळकर, मुंबई
सावळ्या मुलीची गाणी : तुषार जोशी , नागपूर
सईची वही : सुप्रिया जाधव जोशी (नाशिक,पुणे)

साहित्य प्रतिष्ठान

संपादन आणि मांडणी
मयुरेश कुलकर्णी (द. आफ्रिका)

विचारकरी - मराठी कॉमिक स्ट्रिप वाचण्यासाठी इथे जा -
www.facebook.com/vicharkari
मयुरेशच्या कवितांचं पुस्तक - शोध मनाचा (मुक्ता पब्लिशींग हाऊस)

आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा :
ई साहित्य प्रतिष्ठान : 9869674820
mayuresh87@gmail.com
esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान